राज्य आयोग, परिक्रमा खंडपीठ व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या कार्यालयाकरिता लागणाऱ्या कार्यालयीन नोंदवहया शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड मुंबई व येरवडा कारागृह, पुणे यांच्याकडील छपाई कामाचे देयक अदा करण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः पुरवणी-२०१७/प्र.क्र.११७/ग्रासं-४

मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.

तारीख: २८.०३.२०१८

वाचा :-

१) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र .राआ/लेखा/अर्थसंकल्पिय अधिवेशन/पुरवणी मागणी/२०१७-१८/२०१७/३१६०, दि .२०.०६.२०१७

२) शासन परिपत्रक वि.वि.क्र .पुरक-२०१७/प्र.क्र.१२९/अर्थ ३-दि .१८.०८.२०१७

३) शासन निर्णय, सम क्रमांक दि. १८.१०.२०१७.

४) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग ,मुंबई यांचे पत्र क्र .राआ/लेखा/पूरवणी / अनुदान खर्च /२०१७/६०९६ दि ५.१२. २०१७

५) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.-अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८

प्रस्तावना :-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, परिक्रमा खंडपीठ व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या कार्यालयाकरिता लागणाऱ्या कार्यालयीन नोंदवहयांचे छपाईचे काम शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड मुंबई व येरवडा कारागृह, पुणे यांच्याकडून करुन घेण्यात आले होते. सदर छपाईच्या कामाचे देयक वरील कार्यालयांना अदा करण्यासाठी रु. १९,९२,५८२/- इतक्या देयकाचा प्रस्ताव राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला होता. वरील प्रस्ताव वित्त विभागाने विधानमंडळाच्या जुलै, २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर केला आहे. त्यानुसार, राज्य आयोगास ७० टक्के रु. १३,९५,१००/- इतका निधी अदा करण्यासाठी संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. आता राज्य आयोग, मुंबई यांनी संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये उर्वरित निधी अदा करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. परंतु, वित्त विभागाने संदर्भ क्र. ५ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार महसूली लेख्यातील अनिवार्य खर्चाच्या बाबीवर अर्थसंकल्पीय निधी खर्च करण्यासाठी मर्यादा २०% इतकी केली आहे. यास्तव राज्य आयोगास शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई व येरवडा कारागृह, पुणे यांना छपाईच्या कामाचे देयक अदा करण्यासाठी उर्वरीत ३०% ऐवजी २०% रु.३,९८,२२३/- इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

२. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, परिक्रमा खंडपीठ व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच या कार्यालयांकरिता लागणाऱ्या कार्यालयीन नोंदवहयांचे छपाईचे काम शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई व येरवडा कारागृह, पुणे यांच्याकडून करुन घेण्यात आले होते. सदर छपाईच्या देयकाकरिता मंजूर करण्यात आलेले रु. १९,९३,०००/- यापैकी ७०% रु. १३,९५,१००/- इतका निधी राज्य आयोगास वितरित करण्यात आला होता. सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र राज्य आयोगाने सादर केले आहे.

३. यास्तव, वित्त विभागाच्या संदर्भ क्र.५ च्या शासन परिपत्रकानुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांना उर्वरित ३०% ऐवजी २०% रु.३,९८,२२३/- इतका निधी याद्वारे वितरीत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर २०% निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर उर्वरित निधी अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

४. वरील बाबीवर होणारा खर्च - मागणी क्र.एम-२, मुख्य लेखाशीर्ष २४०८ अन्न साठवण व वखार साठवण, ०१-अन्न, १०१-प्रापण व पुरवठा, (०४) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंच स्थापन करणे, (०४)(०१) मुंबई शहर (दत्तमत) (२४०८०२५१), १३-कार्यालयीन खर्च याखाली सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. उक्त शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२१७/अर्थ-१६, दि.१४.०७.२०१७ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१३०४२७३९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

Raju Kalluji Narpande

Digitally signed by Raju Kalluji Narpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=F.C.S and C.P, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c9bb69da44e8b03c93d1a880163547bbb4787f2f2839b6277a288182cbf623cb, cn=Raju Kalluji Narpande
Date: 2018.03.28 13:08:12 +05'30'

(राजू क.नरपांडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद).

२) मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव.
४) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
५) मा.मुख्यसचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२ .
६) प्रधान सचिव ,विधी व न्याय विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२.
७) प्रधान सचिव ,अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२.
८) सह सचिव ,वित्त विभाग/अर्थ-१६.
९) उप सचिव ,अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२.
१०) वित्तीय सल्लागार व उपसचिव ,अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ,मुंबई.
११) प्रबंधक ,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग ,मुंबई.
१२) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चनीरोड, मुंबई.
१३) व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे.
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१४) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (द्वार वित्तीय सल्लागार व उप सचिव)
१६) निवडनस्ती ग्रासं-४